आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ एप्रिल २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचं आवाहन

- ‘गोदा ते नर्मदा जलयात्रेला’ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रारंभ

- राज्यातल्या भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्रिस्तरीय समित्यांची स्थापना

**आणि**

- आयपीएलमध्ये आज दिल्ली कॅपिटल्ससमोर पंजाब किंग्सचं आव्हान तर दुसरी लढत राजस्थान रॉयल्स आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात रंगणार

**<><><><><>**

केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि नागरिकांना वारंवार केवायसी करावं लागू नये यासाठी देशातल्या सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज केलं. सेबीच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. देशातला एखादा शेअर बाजार, शेअर दलाल किंवा संबंधितांवर सायबर हल्ला झाला, तर त्यामुळे होणारं नुकसान भरून यायला मोठा काळ जाऊ शकतो. त्यामुळे सायबर हल्ले, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सेबीनं मजबूत यंत्रणा तयार करावी, अशी सूचना त्यांनी केली. सीमेपलीकडून होणाऱ्या गैरव्यवहारांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या नियामकांशी संपर्क वाढवावा, असंही सीतारमण यांनी सांगितलं. गुंतवणूकदारांमध्ये जागृती करण्यासाठीच्या सेबीच्या अभियानाचा प्रारंभ यावेळी अर्थमंत्र्यांनी केला. देशातले सर्व शेअर बाजार, म्युच्युअल फंड संघटना आणि इतर संस्थांच्या मदतीनं हे अभियान राबवलं जाणार आहे.

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त गोदा ते नर्मदा जलयात्रेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज त्र्यंबकेश्वर इथं प्रारंभ झाला. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. जलसंपदा

विभागाने या यात्रेचं आयोजन केलं आहे. या यात्रेच्या दुसऱ्या तुकडीने अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मस्थानी 'चौंडी' इथून आज यात्रेला सुरुवात केली. ही यात्रा मध्यप्रदेशात महेश्वर पर्यंत जाणार आहे.

अहिल्याबाई होळकर यांनी बारव, तलाव, घाट बांधून जलसंधारणाचं मोठं कार्य केलं, त्यांचा विचार आणि वारसा घेऊन या यात्रा काढल्या आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. कुंभमेळ्याच्या काळात गोदावरी नदी निर्मळ वाहायला हवी, त्र्यंबकेश्वर मधे ती बारमाही वाहायला हवी, यासाठी शासन, व्यवस्था करत आहे. हा 'गोदा ते नर्मदा' यात्रेचा उपक्रम यशस्वी होईल, आणि जलसंधारणाची कामं लोकसहभागातून पूर्ण करू, अशी हमी मुख्यमंत्र्यांनी दिली. 'गोदा ते नर्मदा' ही यात्रा लोकजागृती घडवून आणण्यासाठी आहे असं सांगत नदीजोड प्रकल्पातून महाराष्ट्र दुष्काळमुक्त होईल याचा पुनरूच्चार मुख्यमंत्र्यांनी केला.

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री***

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शन घेऊन पूजा केली. पुढल्या वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त करत ही कामं अधिक वेगाने होतील असं त्यांनी वार्ताहरांना सांगितलं. या अनुषंगाने सर्व आखाड्यांच्या महंतांशी चर्चा करणार असून लवकरच यासाठी बैठक घेण्यात येईल असंही फडणवीस म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या भटके-विमुक्त समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी तसंच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्रिस्तरीय समित्यांची स्थापना केल्याची माहिती, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी पत्रकाद्वारे दिली. राज्यस्तर, जिल्हास्तर आणि उपविभाग स्तरावरच्या या समित्यांच्या माध्यमातून भटके-विमुक्तांच्या तक्रारींचं निवारण तातडीने केलं जाईल, त्वरित कारवाई केली जाईल तसंच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल असं सावे म्हणाले. या तक्रारींचं निवारण वेळेत व्हावं यासाठी स्पष्ट कार्यपद्धती ठरवण्यात आली आहे. प्राप्त तक्रारींवर १० दिवसांत कार्यवाही सुरू करणं बंधनकारक असेल. उपविभाग किंवा जिल्हा स्तरावर कार्यवाही न झाल्यास नागरिकांना राज्यस्तरीय समितीकडे दाद मागता येईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांची वर्षा बंगल्यावर भेट झाल्याच्या बातम्या पूर्णतः निराधार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. काही लोक मुद्दाम खोट्या बातम्या पसरवत असून त्यांना नोटिस पाठवू, असंही फडणवीस म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या ९ सदस्यपदांसाठी उद्या निवडणूक होणार आहे. एकंदर ६० उमेदवार रिंगणात असून सुमारे १ लाख ४० हजार मतदार मतदान करणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात नांदेडमध्ये इस्लामपुरा इथं सांडपाण्याच्या नाल्यालगतच्या १५ फूट खोल खड्ड्यात पडून चार मुलांचा बुडून मृत्यू झाल्याप्रकरणी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगानं नांदेडचे महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना नोटीस बजावली आहे. या घटनेसंदर्भात प्रसारमाध्यमांमध्ये आलेल्या वृत्ताची स्वतःहून दखल घेत ही नोटीस बजावली. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वतीनं नाल्याचं बांधकाम सुरु असताना त्यालगतच्या खड्ड्यात सांडपाणी साचलं होतं, त्यात ही मुलं बुडाल्याचं संबंधित वृत्तात म्हटलं आहे. मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या अनुषंगानं हे प्रकरण गंभीर असल्याचंही आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदी अशोक कुमार लाहिरी यांची नियुक्ती झाली आहे. आज त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. लाहिरी यांच्याशिवाय नीती आयोगाचे पूर्णकालीन सदस्य म्हणून राजीव गौबा, के. व्ही. राजू, गोवर्धन दास, अभय करंदीकर आणि एम. श्रीनिवास यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातली ४४ हजार ३७६ मतदान केंद्रं आणि तमिळनाडूतल्या ७५ हजार ६४ मतदान केंद्रांपैकी कुठेही पुन्हा मतदान घ्यायची शिफारस करण्यात आलेली नसल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. या दोन्ही राज्यांमध्ये मतदानादरम्यान कोणताही मोठा गैरप्रकार घडलेला नाही, असंही आयोगानं नमूद केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १३३ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसंच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होईल.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पहिल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्ससमोर पंजाब किंग्स यांच्यातला सामना थोड्याचवेळात सुरू होणार आहे. या सामन्यात दिल्लीनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. तर दुसरी लढत संध्याकाळी राजस्थान रॉयल्स आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात होणार आहे.

दरम्यान, काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं गुजरात टायटन्सचा ५ गडी राखून पराभव केला. गुजरातच्या संघानं विजयासाठी दिलेलं २०६ धावांचं आव्हान बंगळुरुनं १८ षटकं आणि ५ चेंडूत पूर्ण केलं.

//<><><><><>//